(55)

[१]

औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, औरंगाबाद.

औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाची मंगळवार दिनांक दिनांक ३०.१०.१९९० रोजी नासिक येथे होणारी मंडळाची पूर्वनियोजित बैठक काही अपरिहार्य कारणामुळे औरंगाबाद मंडळाच्या सभागृहात त्याच दिवशी म्हणजे दिनांक ३०.१०.९० रोजी दुपारी ४.०० वाजता घेण्यांत आली. सदर बदलाबाबत आयुक्त नासिक यांच्याशी दुरध्वनीवर पूर्व सम्मती घेण्यांत आली होती. त्या सभेचा कार्यवृत्तांत.

.....

बैठकीस खालील पदाधिकारी उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. श्री. ईश्वर भोसीकर | सभापती औ. मं. |
| २. श्री. अ. म. महाजन | उपसभापती औ. मं. |
| ३. श्री. मुन्शीलाल गौतम आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद. | सदस्य |
| ४. श्री. द. मो. गोडघाटे, उपसंचालक, नगररचना व मुल्यनिर्धारण विभाग, औरंगाबाद. | सदस्य. |

विभागीय आयुक्त औरंगाबाद/नासिक हे अपरिहार्य कारणास्तव मंडळाच्या बैठकीस हजर राहू शकले नाही. त्याचप्रमाणे प्रशासक, म. न. पा. नासिक हेही हजर राहू शकले नाहीत.

विषय क्र. १: दि. २१.९.९० रोजी झालेल्या ५४ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करणे.

ठराव क्र. ३०८

दिनांक २१.९.९० रोजी झालेल्या ५४ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर सविस्तर चर्चा होऊन ५४ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करण्यांत आला.

....

विषय क्र. २: स. न. २५/अ देवळाली, नासिक येथील जमिनीवर
हडको अर्थसहाय्यीत उच्च उत्पन्न गटातील ५६
गाळयाचे बांधकाम.

---

गाळयांच्या किंमतीतील वाढीला मंजूरी देणेबाबत.

ठराव क्र. ३०९

---

या विषयावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की, ५६ गाळयांची किंमत जाहिरात देताना अनुषंगिक बाबीवर ज्या टक्केवारीने आकारणी केली होती. त्याप्रमाणे आकारणी करुन किंमत काढावी त्याप्रमाणे येणा-या किंमतीस प्राधिकरणाची मंजूरी घ्यावी.

विषय क्र. ३: सातपूर, नासिक येथील १०४+७८ उच्च उत्पन्न गटातील
गाळयांना सांडपाण्याची व्यवस्था करुन देणे.

ठराव क्र. ३१०

---

या विषयावर सविस्तर चर्चा करुन मंडळाने असा निर्णय घेतला की, सातपूर नासिक येथील १०४+७८ उच्च उत्पन्न गटातील गाळयांच्या वसाहतीतील सांडपाण्याची व्यवस्था करण्यासाठी प्रत्येक गाळेधारकांकडून त्यांनी दिलेल्या आश्वासनाप्रमाणे रु. ५००/- प्रमाणे रु. ९१,०००/- जमा करवून घ्यावेत व उर्वरीत रु. ३,१४,४००- ९१,०००= रु. २,२३,४००/- आकस्मित दायीत्व या बाबी करिता असणा-या तरतुदीतून खर्च करावा. तसेच शासनाकडून निधी उपलब्ध झाल्यास आकस्मीत दायीत्व या तरतुदीतून खर्ची झालेली रक्कम वळती करण्यांत यावी. प्राधिकरणाची मंजूरी अपेक्षीत धरुन वरील वसाहतीतील काम करण्यास मंडळाने मान्यता दिली. परंतु गाळेधारक रु. ५००/- अगोदर जमा करावे व नंतरच कामास सुरुवात करण्यांत यावी.

. . .

विषय क्र. ४: लातूर येथील अल्प उत्पन्न गट योजने अंतर्गत १६७ गाळयांचे बांधकाम ठेकेदार मे. कुरेशी हयांना वरील कामासाठी लावलेल्या दंडाबाबत फेरनिर्णय घेण्याबाबत व गाळयांची फेर किंमत ठरविणेबाबत.

ठराव क्र. ३११
------------

या विषयावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने खालील प्रमाणे निर्णय घेतला.

१] सदर गाळयांची वाढीव किंमत रु. २७०५० ला मंडळाने मान्यता दिली.

२] ठेकेदाराने बांधकाम चांगल्या प्रतीचे केल्यामुळे व ठेकेदाराची चुक नसतांना ठेकेदारास लावण्यात आलेल्या दंडाची रक्कम माफ करण्यांत यावी. तसेच कार्यकारी अभियंता औरंगाबाद यांनी बांधकामाचे वाढीव कालावधीची कार्योत्तर मंजूरी दयावी.

विषय क्र. ५: विशेष नियोजन प्राधिकरण वाळुज औरंगाबादच्या कार्यक्षेत्र शासन योजनेप्रमाणे फळझाडे लागवडीस कृषी खात्यास " ना हरकत प्रमाणपत्र" देण्याबाबत.

ठराव क्र. ३१२
------------

या विषयावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की, कृषी खात्याकडून ज्या शेतक-यांची यादी ना हरकत प्रमाणपत्रासाठी आली आहे. त्या शेतक-याकडून वैयक्तीक अर्ज व फळझाडे लावण्याच्या योजने संबंधीची माहिती घ्यावी व ज्यांना ना हरकत प्रमाणपत्र देता येणे शक्य आहे. त्यांनाच खालील अटीवर देण्यांत यावे.

१] प्रारुप रचनात्मक नकाशा अंतिम झाल्यावर अंतिम नकाशानुसार जमिनीचा उपयोग जो राहील तो हया जमिन मालकांना बंधनकारक राहील.

२] वरील प्रकरणातील लागवडी खालील जमिनी जेंव्हा केंव्हा शासकीय योजनेसाठी आवश्यक होतील तेंव्हा या " ना हरकत प्रमाणपत्रामुळे" संपादनावर बाधा येणार नाही.

३] हे " ना हरकत प्रमाणपत्र" कोणत्याही प्रकारे जमिन मालक अथवा संबंधीतांना सध्याच्या जमिनीचा उपयोग अबाधीत ठेवण्याकरिता हमी समजू नये.

...

विषय क्र. ६: अविष्कार कॉलनी एन-६ सिडको येथील क्रिडा व सांस्कृतीक मैदानाबाबत.

अविष्कार सहकारी गृहनिर्माण संस्था यांचे दिनांक ४.१०.९० चे निवेदन.

ठराव क्र. ३१३

या विषयावर सविस्तर चर्चा करुन मंडळाने सर्वानुमते असा निर्णय घेतला की, अविष्कार कॉलनी सिडको एन-६ औरंगाबाद या वसाहतीतील अभिन्यासामध्ये नियमाप्रमाणे ४५० चौ.मी. खुली जागा सोडलेली आहे ही खुली जागा अविष्कार सहकारी गृहनिर्माण संस्था या संस्थेस देखभालीसाठी यावी व त्या भूखंडाच्या वापरासंबंधीचे सर्व अधिकार मंडळाकडे राहतील.

मा. सभापतीच्या परवानगीने आयत्यावेळेस येणारे विषय.

विषय क्र. १: औरंगाबाद मंडळाचे स्टेशनरोड देवगिरी कॉलेज जवळील दुकान क्र ८ व २१ चे वाटपाबाबत.

ठराव क्र. ३१४

या विषयावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की, श्रीमती कांचनमाला ब्रम्हेचा व मनोज मुलचंद ब्रम्हेचा हे मुदतीत का पैसे भरु शकले नाही याबाबत परिस्थितीजन्य पुरावे त्यांच्याकडून घ्यावे. त्याचप्रमाणे फेरनिविदे अन्वये सदर दुकानांची काय किंमत आली ते नमुद करावे व पुढील बैठकीत सदर माहिती सादर करावी म्हणजे त्यावर विचार करता येईल.

विषय क्र. २: ८२ गाळे उच्च उत्पन्न गट नविन औरंगाबाद येथील गाळे वाटपाबाबत.

ठराव क्र. ३१५

या विषयावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने सर्वानुमते असा निर्णय घेतला की, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास विनियम १९८१ च्या अंतर्गत विनियम ३१ २] अन्वये दोन महिन्याचे मासिक हप्त्याएवढी बदली फी घेऊन गाळा क्र. ११८५ हा श्रीमती जैस्वाल यांना नियमाप्रमाणे बदलून द्याव व गाळा क्र. १२३३ हा ताब्यात घेऊन कार्यालयीन कामासाठी राखून ठेव...

. . .

विषय क्र. ३: नासिक येथील वडाळा गावठाण व महादेववाडी या झोपडपट्टीतील सुधारणा कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.

ठराव क्र. ३१६

नासिक महानगरपालिकेकडून महादेववाडी झोपडपट्टी व वडाळागावठाण या झोपडपट्टीच्या सुधारणा कामास प्रशासकीय मान्यता मिळावी म्हणून अनुक्रमे रु. १७,०३,१४१ व रु. ६,५७,२०६/- चे प्रस्ताव प्राप्त झाले आहे. या प्रस्तावाची छाननी/तपासणी केली असता अनुक्रमे नियमोप्रमाणे रु. २,८८,३८७ व रु. ३,३९,९४९/- ची प्रशासकीय मान्यता देता येऊ शकेल.

सन १९९०-९१ वर्षात नाशिक शहरासाठी झोपडपट्टी सुधारणासाठी रु. ६.५० लक्षाची तरतुद प्रस्तावीत आहे. अद्याप पावेतो नासिक महानगरपालिकेचा या कामावरील खर्च निरंक असून संपूर्ण तरतुद शिल्लक आहे. नासिक महानगरपालिकेच्या हाती सध्या रु. ४.५७ लक्ष रुपयाची कामे आहेत. ही कामे पूर्ण होऊनही या वर्षाची संपूर्ण तरतुद खर्च होऊ शकणार नाही. त्यामुळे संपूर्ण तरतुद खर्च होण्याच्या दृष्टीने तसेच पुढील आर्थिक वर्षात महानगरपालिकेच्या हाती कामे असण्याच्या दृष्टीने महादेववाडी व वडाळा गावठाण या झोपडपट्ट्यांच्या सुधारणा कामांना अनुक्रमे रु. २,८८,३८७ व रु ३,३९,९४९ ची प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे. परंतु महानगरपालिकेने महादेववाडी झोपडपट्टी येत्या तीन वर्षात हलविली जाणार नाही असे हमी पत्र देण्याच्या अटीवरच रु. २,८८,३८७ ची प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे.

विषय क्र. ५ [अ]

स. न. ४५ शाहनुरवाडी, औरंगाबाद येथील भूखंडावर अल्प उत्पन्न गटातील १५० गाळे बांधकामासाठी प्राप्त झालेल्या निविदावर निर्णय घेणेबाबत.

सदर विषयास सुरुवात करतांना श्री. मुन्शीलाल गौतम, आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद व श्री. द. मो. गोडघाटे, उपसंचालक नगररचना व मुल्यनिर्धारण विभाग, औरंगाबाद यांनी विचारणा केली की, सदरच्या निविदा दिनांक १.९.९० रोजी उघडण्यांत आल्या आहेत. मात्र निविदांची मुदत ज्या दिवशी संपते त्या दिवशी सदर विषय मंडळापुढे निर्णयास्तव ठेवण्यांत आला आहे. त्याचा खुलासा करावा.

यावर उपसभापती यांनी खुलासा केला की, मुख्य अभियंता/प्राधिकरण यांचेकडे निविदा समितीची तारीख ठरविण्यासाठी विचारणा करण्यांत आली होती. . त्यांना कार्यबाहुल्यामुळे सभा मुंबईला ठेवावी असे सुचविले होते. परंतु अध्यक्ष निविदा समिती व इतर सभासद यांचे मुंबईला सभा घेण्याबाबत तारखेचे संकलन होऊ शकले .-

नाही. शेवटी निविदाची मुदत टळत असल्यामुळे मुख्य अभियंता यांनी कळविल्याप्रमाणे दिनांक २६.१०.९० रोजी निविदा समितीची बैठक ठेवण्यांत आली होती. यावर आयुक्त म.न.पा. औरंगाबाद हयांनी सांगितले की, निविदा समितीचे अध्यक्ष यांना समितीच्या बैठकीची तारीख विचारणा करणे आवश्यक आहे. निविदा समितीचे अध्यक्ष जी तारीख सभेसाठी निश्चीत करतील त्या तारखेस निविदा समितीची बैठक घेणे आवश्यक आहे. मुख्य अभियंता/प्रा. हे सदर समितीचे सभासद आहेत त्यांना समितीची तारीख कळविण्यांत यावी.

यावर सभापती यांनी सांगितले की, याप्रमाणे यापुढे कार्यवाही केली जाईल.

या विषयावर सविस्तर चर्चा करण्यांत येऊ निविदा समितीने सादर केलेला अहवाल विचारात घेण्यांत आला यावरुन मंडळास आढळुन आले की, कमी दराचे ठेकेदार मे. एम. एच. कन्स्ट्रक्शन अहमदनगर यांनी नमुद केलेला दर ७.८६% जादा हा वाजवी आहे.

ठराव क्र. ३१७

या विषयावर सविस्तर चर्चा होऊन व निविदा समितीच्या शिफारशी विचारात घेऊन मंडळाने असा निर्णय घेतला की, मे. एम. एच. कन्स्ट्रक्शन अहमदनगर यांची सर्वात कमी दराची निविदा म्हणजेच एस्टीमेट दरापेक्षा ७.८६% ने जास्तची मान्य करण्यांत आली.

विषय क्र. ४ [ब]

स.न. ४५ शहानुरवाडी औरंगाबादमधील भूखंडावर उच्च उत्पन्न गटातील ७३ गाळे बांधकामासाठी प्राप्त झालेल्या निविदांवर निर्णय घेणेबाबत.

या विषयावर सविस्तर चर्चा करण्यांत आली. त्याचप्रमाणे निविदासमितीने शिफारस केलेला अहवाल सभेपुढे ठेवण्यांत येऊन त्यावर सविस्तर चर्चा करण्यांत आली. मंडळाला असे आढळुन आले की, सर्वात कमी दराचे ठेकेदार मे. लक्ष्मी कन्स्ट्रक्शन कं. सोलापूर यांनी नमुद केलेले दर १३.९५% जादा हे जास्त आहेत. सबब ठेकेदाराशी वाटाघाटी करणे आवश्यक आहे. सदर ठेकेदार मंडळाच्या सभेच्या दिवशी हजर असल्यामुळे त्यांना मंडळापुढे बोलविण्यांत येऊन मंडळाने त्यांना विनंती केली की, त्यांनी नमुद केलेला दर हा त्याच भूखंडावरील दुस-या कामासाठी दुस-या ठेकेदाराने नमुद केलेला दर हा कमी दराचा आहे. त्यामुळे त्यांनी पुनर्विचार करुन आपला दर कमी करावा. ठेकेदाराने मंडळापुढे नमुद केले की, निविदेत विचारात घेण्यात आलेले दर हे सन ८९-९० वर आधारीत आहेत. चालु वर्षीच्या दरसूचीप्रमाणे दरामध्ये मोठया प्रमाणात वाढ झालेली आहे. त्याचप्रमाणे १५ दिवसापूर्वी पेट्रोल व डिझेलच्या दरात वाढ झाल्यामुळे बांधकाम साहित्यावरील दर हा मोठया प्रमाणात वाढलेला आहे. त्यांनी नमुद केलेला दर १३.९५% जादा हा अगदीवाजवी आहे. त्यावर मंडळाने त्यांना

सांगितले की, त्याचे दर जास्त आहे. त्यांनी पुनर्विचार करून नंतर नंतर ज्या दराने काम करण्यास ते तयार आहेत त्याबाबत लेखी सादर करावे. ठेकेदाराने त्यांच्या निविदेत नमुद केलेला दर ७% कमी करून ११.९५% जास्तीने काम करावयास ते तयार असल्याचे लेखी निवेदन सादर केले. त्यावर मंडळाने पुन्हा दर कमी करण्याबद्दल सांगितले. परंतु ते तयार झाले नाही.

निविदा समितीने शिफारस केली आहे की, जर लक्ष्मी कन्स्ट्रक्शन कं. सोलापूर हे १२% जास्तीने किंवा त्यापेक्षा कमी दराने काम करावयास तयार असल्यास सदर काम त्यांना द्यावे मे. अंजय्या कॉन्ट्रॅक्टर यांनी १२% जादाने काम देण्यांत यावे त्यावर आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांनी सांगितले की, त्याच भूखंडावर आणि त्याच बरोबर दुस-या भूखंडावर दुस-या कामासाठी प्राप्त झालेला दर हा लक्ष्मी कन्स्ट्रक्शन कं. यांनी पुनर्विचार करून दिलेला दर ११.९५% जादा हा दर जादा आहे. त्यामुळे ते स्वीकारणे योग्य होणार नाही. कारण की, सभेमध्ये तीन कामाबाबत. मंजूरीसाठी विचार करीत आहोत. त्यावर उपसभापतींनी सांगितले की, जर आपण सदरच्या निविदा नाकारल्यास व पुन्हा निविदा मागविल्यात तर पेट्रोल व डिझेलच्या दरात झालेली वाढ विचारात घेता १२% पेक्षा कमी दर प्राप्त होणार नाही असा अंदाज आहे. त्यावर आयुक्त औरंगाबाद महानगरपालिका यांनी सांगितले की, ११.९५% जादाचे दर मंजूर करणे संयुक्तीक वाटत नाही.

ठराव क्र. ३१८

---

या बाब टिप्पणीवर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की, सदर कामासाठी परत निविदा बोलविण्यांत याव्यात.

विषय क्र. ४ [क]

---

आर-४३, एन-७ सिडको -- नविन औरंगाबाद येथे २६ उच्च उत्पन्न गट गाळे बांधकामासाठी प्राप्त झालेल्या निविदांवर निर्णय घेणेबाबत.

---

याबाबत सभेमध्ये सविस्तर चर्चा करण्यांत आली. त्याप्रमाणे निविदा समितीने सादर केलेल्या शिफारशीचा अहवाल सभेमध्ये ठेवण्यांत येऊन त्यावर चर्चा करण्यांत आली. निविदा समितीने शिफारस केल्याप्रमाणे कमी दराची निविदा ठेकेदार मे. शिवशोभा कन्स्ट्रक्शन कं. मुंबई यांचे दर ९% जादा हा वाजवी असल्याचे आढळून आले तथापी त्यांनी निविदेची मुदत वाढ त्यांना कळवून देखील कार्यालयास दिलेली नाही. त्यांना त्याचे दर मंजूर झाल्यास आजच कळविणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे त्यांना

तारेने कळविण्यांत यावे. त्याप्रमाणे कळवून देखील जर त्यांनी काम स्वीकारले नाही तर त्याची इसारा रक्कम जप्त करण्याची कार्यवाही करण्यांत यावी व दुस-या क्रमांकाचे ठेकेदार मे. पी. अंजय्या यांनी निविदा समितीसमोर वाटाघाटीने दिलेला दर १०% जादा मान्य करण्यांत यावा.

ठराव क्र. ३१९

या विषयावर सविस्तर चर्चा होऊन व निविदा समितीच्या शिफारशीचा विचार करुन मंडळाने असा निर्णय घेतला की, मे. शिवशोभा कन्स्ट्रक्शन कं. मुंबई यांना त्यांची निविदा स्विकारल्याबद्दल कळवावे व जर कळवूनही त्यांनी सदर काम करण्याचे टाळले तर त्यांनी सादर केलेली इसा-याची रक्कम जप्त करण्याची कारवाई करुन श्री. पी. अंजय्या यांनी कमी केलेला दर १०% जादाचे स्विकृत करणेबाबत मुख्याधिकारी औरंगाबाद मंडळ यांनी कार्यवाही करावी.

बैठकीनंतर मा. सभापतींचे आभार मानून सभा संपली.

. . .